# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६१७९६१ , फॅक्स — २२६९००७७
E-mail :-desk१८@dtemaharashtra.com Internet : www.dtemaharashtra.gov.in

रजिस्टर्ड एडी/ ई-मेलद्वारे

जा.क्र.१८/तशिसं/पं.दे.नि.भ./२०१८/ २४४
दिनांक :
21 JUN 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारित योजना- उत्पन्न मर्यादा रुपये ८.०० लाखापर्यंत वाढविणेबाबत.

संदर्भ : उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१८५/तांशि-४, दि. १८ जून, २०१८.

महोदय,

उपरोक्त विषयासंबंधी शासनाकडून वरील संदर्भीय शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार आपल्या स्तरावर कार्यवाही करावी व सदर शासन निर्णयाची आपल्या विभागांतर्गत येणा-या उच्च व्यावसायिक व तांत्रिक अभ्यासक्रम चालविण्या-या सर्व संस्थांना माहिती करुन द्यावी व त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यातबाबतच्या सूचना देण्यात याव्यात. संदर्भिय शासन निर्णयाची अंमलबजावणी ही शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून करण्यात यावी. सदर शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाने आपणांस खालील विभागवार ई-मेल पत्त्यावर पाठविलेली आहे.

१) romumbai@dtemaharashtra.gov.in
२) ropune@dtemaharashtra.gov.in
३) ronashik@dtemaharashtra.gov.in
४) roaurangabad@dtemaharashtra.gov.in
५) roamravati@dtemaharashtra.gov.in
६) ronagpur@dtemaharashtra.gov.in

आपला

(व्ही. जी. तांबे)
सहा. संचालक (तां.)
तंत्रशिक्षण संचालक, म. रा. मुंबई.

प्रत. — कार्यासन अधिकारी का.क्र. २, २अ, १० व ३ यांना माहिती [illegible]

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/शैवि/निर्वाह भत्ता/2018/ 2212
दिनांक :-
25 JUN 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था , नागपूर विभाग,
नागपूर .

आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष 2018-19 पासुन "डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना" या योजनेंकरिता, सदर शासन निर्णय पत्रात नमुद केलेल्या अटीप्रमाणे अंमलबजावणी करण्यांत यांवी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.

डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना-उत्पन्न मर्यादा रुपये ८.०० लाखापर्यंत वाढविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय: संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१८५/तांशि-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १८ जून, २०१८

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६

२) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ७ ऑक्टोबर,२०१७

३) शासन शुध्दिपत्र, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक १३ नोव्हेंबर, २०१७

४) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४०७/तांशि-४, दिनांक २२ फेब्रुवारी,२०१८

५) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. टिईएम-२०१८/प्र.क्र.३५/तांशि-४, दिनांक ३१ मार्च,२०१८

<u>प्रस्तावना</u> :-

राज्यातील मान्यताप्राप्त शासकीय, शासन अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतनांमध्ये शासनाने निर्धारित केलेल्या निवडक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या, ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांना वसतिगृहाअभावी व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करण्यास व्यत्यय येऊ नये यासाठी शासनाने संदर्भ क्र. १ येथील दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून कार्यान्वित केली आहे. तसेच संदर्भ क्र.२ येथील दिनांक ७ ऑक्टोबर,२०१७ च्या शासन निर्णयान्वये काही नवीन अभ्यासक्रमांचा समावेश या योजनेकरीता करण्यात आला. तसेच याच शासन निर्णयाव्दारे ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर नाहीत, परंतु ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रुपये १.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसह बिगर व्यावसायिक आणि उच्च माध्यमिक (इयत्ता ११ वी / १२ वी) अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्षातील १० महिन्यांकरीता अनुक्रमे रुपये ३०००/-, रुपये २०००/- व रुपये १०००/-याप्रमाणे निर्वाहभत्ता मंजूर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे संदर्भ क्र.४ येथील दिनांक २२ फेब्रुवारी,२०१८ च्या शासन निर्णयान्वये ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्प

भूधारक शेतकरी/ नोंदणीकृत मजूर नाहीत, परंतु ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रुपये ६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता महानगरासाठी रुपये १००००/- व महानगरे वगळून व इतर शहरे व ग्रामीण भागासाठी रुपये ८०००/- प्रतिवर्ष इतका निर्वाहभत्ता शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून देण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच या शासन निर्णयाव्दारे रुपये १.०० लाख ते रुपये ६.०० लाख उत्पन्न मर्यादा असलेल्या विद्यार्थ्यांकरीता प्रत्येक जिल्हयासाठी लाभार्थी विद्यार्थ्यांची कमाल संख्या ५०० इतकी निश्चित करण्यात आली आहे.

३. राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीसाठी संदर्भ क्र.५ येथील दिनांक ३१/०३/२०१८ च्या शासन निर्णयाव्दारे पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लाखावरुन वार्षिक रुपये ८.०० लाख इतकी करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. मराठा आरक्षणासंदर्भात मा.मंत्री, महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीने केलेल्या सूचनेस अनुसरुन राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता विस्तारीत योजना या दोन्ही योजनेमधील पालकांची उत्पन्न मर्यादा एकरुप असण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. त्यामुळे रुपये ८.०० लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी ( अल्पभूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर वगळून ) डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील मान्यताप्राप्त शासकीय, शासन अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतनांमध्ये शासनाने निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे ( दोन्ही पालकांचे एकत्रित ) वार्षिक उत्पन्न रुपये ८.०० लाखापर्यंत आहे, अशा विद्यार्थ्यांकरीता डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाहभत्ता विस्तारीत योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. या या निर्णयामुळे रुपये १.०० लाख ते रुपये ८.०० लाख उत्पन्न मर्यादा असलेल्या विद्यार्थ्यांकरीता प्रत्येक जिल्हयासाठी निश्चित करण्यात आलेली लाभार्थी विद्यार्थ्यांची कमाल ५०० संख्या कायम राहिल, त्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. या योजनेसाठी यापूर्वीच्या विविध शासन निर्णयातील इतर अटी व शर्ती कायम राहतील.

२. याबाबत पुढे असे स्पष्ट करण्यात येते की, डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना जे विद्यार्थी विविध विहित अभ्यासक्रमांसाठी बिगर आरक्षित प्रवर्गातून प्रवेश घेतील व विविध शासन निर्णयाव्दारे विहित केल्याप्रमाणे सर्व अटी व शर्ती पूर्ण करतील अशा विद्यार्थ्यांकरीता लागू करण्यात आलेली आहे.

३. सदर शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ४५९/१८, व्यय-५, दिनांक १५ जून, २०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्याचा संगणक सांकेतांक २०१८०६१८१६३३४७५९०८ असा असून सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bea23011448b7f c64d136630b9c76ac7a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2018.06.18 17:08:31 +05'30'

( संजय औ.धारुरकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्य मंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (कृषि), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव (प.दु.म.), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र. कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
१२. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
१३. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१४. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१६. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१७. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
२०. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
२४. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
२५. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
२६. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२७. सहसंचालक,तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२८. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२९. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई प्रसिध्दीसाठी)
३०. सर्व जिल्हाधिकारी
३१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३६. मा.मंत्री, महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.वगळून) यांचे खाजगी सचिव
३७. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी
३८. मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे खाजगी सचिव
३९. मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांचे खाजगी सचिव
४०. मा.मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग यांचे खाजगी सचिव
४१. मा.मंत्री, कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण यांचे खाजगी सचिव मा.मंत्री, कृषि यांचे खाजगी सचिव
४३. मा.मंत्री, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय यांचे खाजगी सचिव
४४. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
४५. सहसचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

४६. उप सचिव (मशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

४७. अवर सचिव (तांशि-३, विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

४८. कक्ष अधिकारी (मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

४९. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक

५०. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक

५१. निवडनस्ती/तांशि-४